# जाहीरात

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.मातंसं-१७१६/प्र.क्र.५१७/३९, दिनांक १९/०१/२०१८ अन्वये मुंबई उपनगर जिल्ह्यात खाली दर्शविले प्रमाणे 'आपले सरकार सेवा केंद्रे' सुरू करावयाची आहेत. त्याकरिता इच्छूक उमेदवार/संस्था यांचेकडुन विहीत नमुन्यात अर्ज मागविणेत येत आहेत.

'आपले सरकार सेवा केंद्र' नियुक्त करणेबाबतचा तपशिल-

| अ.क्र. | प्रभाग | आवश्यक केंद्राची | सद्यस्थितीत कार्यरत | नव्याने नियुक्त करावयाची केंद्र संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | एच/पूर्व | २२ | १० | १२ |
| २ | एच/पश्चिम | १२ | २ | १० |
| ३ | के/पूर्व | ३३ | १७ | १६ |
| ४ | के/पश्चिम | ३० | ५ | २५ |
| ५ | एल | ३६ | २१ | १५ |
| ६ | एम/पूर्व | ३२ | २० | १२ |
| ७ | एम/पश्चिम | १६ | ११ | ५ |
| ८ | एन | २५ | ९ | १६ |
| ९ | पी/उत्तर | ३८ | ११ | २७ |
| १० | पी/दक्षिण | १९ | ७ | १२ |
| ११ | आर/उत्तर | १७ | ६ | ११ |
| १२ | आर/दक्षिण | २८ | ६ | २२ |
| १३ | आर/मध्य | २२ | १९ | ३ |
| १४ | एस | ३० | १२ | १८ |
| १५ | टी | १४ | ९ | ५ |
| | एकूण | ३७४ | १६५ | २०९ |

एकूण केंद्राच्या ३% केंद्र अपंगाकरिता राखीव राहतील.

तरी इच्छूक उमेदवारांनी/संस्थांनी विहीत नमून्यात अर्ज दाखल करावेत. अर्ज दाखल करावयाची अंतीम मुदत ३०/०६/२०१८ आहे. त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. अर्जाचा विहीत नमूना www.mumbaisuburban.gov.in या संकेतस्थळावर दि.२०/०६/२०१८ उपलब्ध होईल. सदरचे अर्ज हे फक्त ऑनलाईन च स्विकारले जातील याची नोंद घ्यावी.

ऑनलाईन अर्ज दाखल करणेच्या प्रक्रिये संदर्भात श्री. प्रमोद मुरकुटे , मो.-९७५८४९९९०० व श्री. शोयेब पटेल, मो.९९७५९८१११६ यांचेशी संपर्क साधावा.

**उमेदवार/ संस्था यांचे निवडी करीता अटी व शर्ती-**

१) उमेदवारांकडे अथवा त्यांचे संगणक चालकाकडे संगणक ज्ञानाबाबत (MS-CIT/CCC) प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२) उमेदवार हा गुंतवणकीच्या दृष्टींकोनातून कक्षम असला पाहिजे.

३) उमेदवाराने संगणक साहित्य व इतर अनुषांगिक साहित्य व जागा उपलब्धतेबाबत अर्जासोबत योग्य तो तपशिल जोडणे आवश्यक आहे.

४) जागा स्वत: चा नसलेस जागा मालकाचे नाहरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५) CSC ID व अस्तित्वात असणा-या B२C सेवा देणा-या केंद्र चालकांनी अर्ज केल्यास त्यांना प्राधान्य क्रमाने आपले सरकार सेवा केंद्र देण्यात येईल.

६) एकापेक्षा अधिक CSC ID असणा-या केंद्र चालकांनी एका जागेसाठी अर्ज केल्यास केंद्राच्या उलाढाली व्यवहारांची संख्या तसेच अपंग उमेदवारस (३% च्या मर्यादेत ) प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

७) आपले सरकार सेवा केंद्र धारक म्हणून पात्र ठरल्यास एक महिन्यात पोलीस विभागाकडून चारित्र्य पडताळणी करून घेणे आवश्यक राहील.

८) महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेल्या आपले सरकार सेवा केंद्रा बाबतच्या दि. १९/०१/२०१८ च्या शासन निर्णयाला अधिन राहून केंद्राची नियुक्ती व संचालन केले जाईल तसेच आवेदकांना अटी व शर्तींचे पालन करावे लागेल.

९) शासनाने ठरवून दिलेल्या वेळापत्राकानुसार केंद्र चालू ठेवणे, शासनाने ठरवून दिलेल्या दरपत्रक केंद्रावर प्रसिध्द करणे, तसेच ठरवून दिलेल्या दरापेक्षा अधिक शुल्काची आकारणी न करणे. शासनाने पुरविलेल्या आज्ञावली इ. चे योग्य वापर ,संरक्षण व जतन करणे आवेदकांना बंधनकारक राहील.

१०) आपले सरकार सेवा केंद्र हे केंद्राच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अधिसूचित ठिकाणीच चालविणे क्रम प्राप्त आहे. केंद्राचे ठिकाण बदलण्यात आल्याचे निदर्शनास आल्यास गंभीर स्वरूपाची चूक समजून केंद्र रद्द करण्यात येईल.

११) अर्जामध्ये भरण्यात आलेली माहिती चूकीची आढळल्यास त्यांचा अर्ज कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येवून त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

१२) आपले सरकार सेवा केंद्रांना शासनाचे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत वेळोवेळी देण्यात येणा-या निर्देशांचे पालन करावे लागेल. तसेच उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांचे वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करावे लागेल. तसेच त्यांनी केंद्राबाबत मागितलेले अहवाल तात्काळ सादर करावे लागतील.

१३) शासन निर्णयानुसार ठरवून दिलेल्या सर्व सेवा आपले सरकार सेवा केंद्रातून देणे अनिवार्य राहील. याबाबत नागरिकांकडून तक्रारी प्राप्त झाल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात येईल व चौकशी करून दोषी आढळेलस कारवाई करण्यात येईल.

१४) प्राप्त अर्जांपैकी कोणता अर्ज स्विकारायाचा, कोणता अर्ज नाकारायचा किंवा संपूर्ण प्रक्रिया कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार मा.अध्यक्ष, जिल्हा सेतू समिती तथा जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे राखून ठेवण्यात आले आहे.

दिनांक- १५/०६/२०१८

**स्थळ प्रतिवर मा.जिल्हाधिकारी यांची सही असे.**

जिल्हाधिकारी,
**मुंबई उपनगर करिता**

15/6